कॉलेजरोडला मद्यपींचा राडा

नशेत कार चालवून पोलिसांशी हुज्जत; दोघे ताब्यात

नाशिक। प्रतिनिधी

मद्याच्या धुंदीत कार चालवून टोळक्याने पेट्रोलिंगवरील पोलिसांशीच हुज्जत घातल्याचा प्रकार कॉलेज रोडवील हॉलमार्क चौकात (दि. १६) मध्यरात्री दोन वाजता घडला. याबाबत दोघांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर गंगापूर पोलीस ठाण्यात गंभीर कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

शैलेश प्रकाश शेट्टे(वय २४, रा. म्हसोबा मंदिराजवळ, नारायण बापू नगर, जेलरोड, नाशिकरोड) आणि अभिक कैलास गायकवाड(वय- २४, रा. महालक्ष्मी बिल्डिंग, सैलानी बाबा स्टॉपजवळ, जेलरोड) अशी मद्यपी संशयितांची नावे आहेत. ते बेरोजगार असून टवाळकी आणि व्यसनातून त्यांनी हा प्रकार केल्याचे समोर येते आहे. काही दिवसांपूर्वी गंगापूर पोलिसांच्या हद्दीतील प्रसाद सर्क लजवळ सहा ते सात संशयितांनी नशेत राडा घालून पोलिसांशी हुज्जत घातली होती. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने पोलीस टिकेचे धनी झाले होते. मात्र, त्यानंतर पोलिसांनी सुमोटो कारवाई करुन टोळक्यावर गंभीर स्वरुपाची कारवाई करुन ताब्यात घेतले होते. या प्रकाराला आठवडा उलटत नाही तोच, गंगापूर पोलिसांच्या हद्दीतील कॉलेजरोडवरील हॉलमार्क चौकात शेट्टे व गायकवाडने नशेत (दि. १६) नशेत तुफान राडा घातला. धुंदीत असताना दोघांनीही या भागात आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग केला. तपास हवालदार किशोर पगार करत आहेत.

पोलिसांशी वाद

या राड्याची माहिती कळताच, गंगापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अधिकारी व अंमलदारांनी दोघांना सार्वजनिक शांतता भंग करण्यापासून रोखले असताही त्यांनी अंमलदार प्रकाश दळवी आणि पथकाशी वाद घालून सरकारी कर्तव्य करण्यास अटकाव केला. दरम्यान, शेट्टे याने मद्याच्या नशेत ताब्यातील स्विफ्ट कार(एमएच १५ एचवाय १८००) चालवून इतरांच्या जीवितास धोका निर्माण केल्याचे आढळून आले. मोठ्या प्रयत्नांती दोघांवर नियंत्रण मिळवून पोलिसांनी त्यांना पोलीस ठाण्यात नेले.

अबब...! ४१ वर्षांनी मिळाला न्याय

शिक्षा सुनावल्यावरही अंमलबजावणी नाही; आरोपींना नुकतीच अटक

नाशिक । प्रतिनिधी

सन १९८४ मध्ये मालेगाव तालुक्यातील खायदे येथे कौटुंबिक वादातून एकाचा खून झाल्यावर खटला उभा राहून जिल्हा न्यायालयाने आरोपींना शिक्षा ठोठावली. मात्र, त्यावरील अपील सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले. सर्वोच्च न्यायालयाने पुनर्विचारासाठी मुंबई उच्च न्यायालयात खटला पाठविला. सन. २००९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयानेही शिक्षा सुनावली. परंतु शिक्षा सुनावल्यानंतरही आरोपींविरोधात शिक्षेची अंमलबजावणी झालीच नाही. अखेर पीडितांनी जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाकडे दाद मागितली. तेव्हा खटल्यातील काही आरोपी मरण पावल्याचे समोर आले. तर, उर्वरित चौघांना अटक करून नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले आहे. त्यामुळे या घटनेत पीडित कुटुंबास तब्बल ४१ वर्षांनी न्याय मिळाला.

खायदे येथील काशिनाथ जाधव यांचा भाऊबंदकीच्या वादातून १९८४ मध्ये खून झाला होता. यात २७ आरोपींविरोधात नाशिकच्या अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयाने खटला चालून ८ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. सन १९८५ मध्ये आरोपींनी या निकालाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अपील केले. तर, सरकारतर्फे निर्दोष सुटलेल्या १९ जणांविरोधात अपील केले. त्यानंतर, २५ एप्रिल २००० रोजी आधीच्या ८ आरोपीची शिक्षा कायम ठेवत, निर्दोष सुटलेल्यांपैकी दोघांना दोषी ठरविले. त्यानुसार १० आरोपींना जन्मठेप सुनावली. आरोपींनी याही निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. २००४ मध्ये सर्वोच्च न्यायालयात हे अपील पुनर्विचारासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडे पाठविले असता, ६ जून २००९ रोजी १० आरोपींविरोधातील शिक्षा कायम ठेवली. तर, २००९ मध्ये आरोपींविरोधात निकाल दिल्यानंतरही मागील १५ वर्षांपासून आरोपींना सुनावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी झाली नव्हती. त्यामुळे पीडित कुटुंबाने जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाकडे धाव घेतली. गेल्या सप्टेंबर २०२४ मध्ये प्राधिकरणाने या खटल्यासाठी अॅड. अरुण दोंदे यांची नियुक्ती केली. खटल्याचे कामकाज चालून २००९ पासून शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपींनी प्रत्यक्षात शिक्षाच भोगलेली नसल्याचे निष्पन्न झाले.

प्राधिकरणाकडून चालविलेल्या खटल्यात १० आरोपींनी शिक्षाच भोगलेली नव्हती. तर, ९० आरोपींपैकी ५ आरोपी मयत झाले होते. एका आरोपीने शिक्षा भोगली. तर उर्वरित चार आरोपी बाळू श्रीपत जाधव, तुळशीराम रामचंद्र जाधव, दामोदर फकीरा जाधव, श्रीधर श्रीपद जाधव यांची शिक्षा न्यायालयाने कायम ठेवली आणि त्यांना अटक करुन नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात दाखल करण्याचे आदेश दिले

विनामूल्य खटला चालवला

प्राधिकरणाने या खटल्यासाठी अॅड. अरुण दोंदे यांची नियुक्ती केली होती. अॅड. दोंदे यांना अॅड. विवेककुमार अगरवाल, अॅड. गिरीश देवरे, अॅड. सबीना सय्यद, अॅड. सुनील वाघ, अॅड. खुशबू चांदवडकर, अॅड. माधुरी पेठकर, अॅड. गोरख उशिरे, अॅड. दिया गुप्ता, मीनाक्षी कोपरगावकर यांनी मदत केली. खटला वकिलांनी मोफत चालविला.

दागिने ओरबाडले

नाशिक । हिरावाडीतील मंदिरात देवदर्शनासाठी पायी जाणाऱ्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी खेचून नेल्याचा प्रकार घडला. मालती गोकूळ शेलार (६५, रा. शामदर्शन सोसायटी, हिरावाडी) यांच्या फिर्यादीनुसार, रविवारी (दि. १६) सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्या सिद्धेश्वर मंदिरात देवदर्शनासाठी जात असताना, मोपेडवरून आलेल्या चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील ६० हजारांचे सोन्याचे गंठण बळजबरीने खेचून नेले. पंचवटी पोलिसात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

वाहनाची चोरी

नाशिक । भद्रकाली हद्दीतील गंजमाळ येथून दुचाकी चोरून नेण्यात आली आहेत. अनिल दादाराव लेहनार (रा. म्हाडा बिलडिंग, भीमवाडी, गंजमाळ) यांची २० हजारांची दुचाकी १२ तारखेला मध्यरात्री घराच्या समोर पार्क असता चोरट्याने चोरून नेली. भद्रकाली पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

मिक्सरखाली सापडून तरुण ठार

नाशिक । सातपूर औद्योगिक वसाहतीत सिमेंट मिक्सर वाहनाने ओव्हरटेक करताना धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार युवक ठार झाल्याची घटना घडली. तेजस गंगाराम वनसे (रा. नाशिक) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. अमोल हरिश दिवे (२३, रा. सावरगाव, ता. नाशिक) यांच्या फिर्यादीनुसार, गुरुवारी (दि. १३) सकाळी १० च्या सुमारास पल्सर दुचाकीवरून अमोल आणि तेजस हे दोघे सातपूर गावाकडून घराकडे जात होते. त्यावेळी बाबासाई बेकरीसमोर भरधाव वेगात ओव्हरटेक करणाऱ्या सिमेंट मिक्सर वाहनाच्या (एमएच १५ इजी ०३०२) पाठीमागील लोखंडी शिडीचा धक्का दुचाकीला लागला. त्यामुळे दुचाकीवरील तेजस खाली पडला आणि सिमेंट मिक्सर वाहनाचे चाक त्याच्या छातीवरून गेले. त्यामुळे तो जागीच ठार झाला. याप्रकरणी सातपूर पोलिसात संशयित सिमेंट मिक्सर वाहनाचालक दत्तू प्रभाकर आव्हाड याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, उपनिरीक्षक बटुळे तपास करीत आहेत.

युवकाची आत्महत्या

नाशिक । चुंचाळे शिवारात युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. सुमीत वसंत पाईक्राव (२०, रा. घरकुल, चुंचाळे शिवार) असे मृताचे नाव आहे. सुमित याने रविवारी (दि. १६) दुपारी अडीच्या सुमारास घरातील पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता, त्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. अंबड पोलिसात मृत्यूची नोंद झाली आहे.

लिफ्ट देण्यास नकार दिल्याने मारहाण

नाशिक । वाहनावरुन लिफ्ट देण्यास नकार दिल्याच्या रागातून संशयितांनी वाहनधारकावर कोयत्याने वार केले तर त्याच्या पत्नीस धक्काबुक्की केली. नीलेश दादाजी रौंदळ (रा. योगिता सोसायटी, अशोकनगर, सातपूर) यांच्या फिर्यादीनुसार, ते शनिवारी (दि. १५) रात्री दहाच्या सुमारास पत्नीसह स्कूटरवरुन मेडिकलकडे जात होते. त्यावेळी संशयित एस. के. रिक्षावाल्याचा मुलगा (रा. राधाकृष्णनगर, सातपूर), बबुआ अन्सारी (रा. वास्तूनगर, अशोकनगर, सातपूर) यांनी निलेश यांना रोखले आणि त्याच्या मित्राला स्कूटरवरुन घरी सोड असे सांगितले. निलेश यांनी नकार दिला असता, संशयिताने त्याच्याकडील कोयत्याने मारून जखमी केले. तर त्यांच्या पत्नीला धक्काबुक्की केली. सातपूर पोलिसात दोघांविरोधात मारहाणीचा गुन्हा दाखल आहे.

डोक्यात बाटली फोडली

नाशिक । श्रमिकनगर येथे दुचाकी न दिल्याच्या कारणावरून संशयिताने एकाच्या डोक्यात बिअरची बाटली मारून जखमी केले. गणेश आहिरे (२३), बाबू यादव (२०), साहिल गांगुर्डे (२१, रा. कडेपठार चौक, श्रमिकनगर, सातपूर) अशी संशयितांची नावे आहेत. समाधान तुळशीराम तालखे (३२, रा. कडेपठार चौक, श्रमिकनगर, सातपूर) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी (दि. १५) सायंकाळी साडेसातच्या सुमारास ते दुचाकीवरून घरी येत होते. त्यावेळी संशयितांनी त्यांच्याकडे दुचाकी मागितली असता, त्यांनी नकार दिला. त्याचा राग धरून संशयित बाबू यादव याने बिअरची बाटली त्यांच्या डोक्यात फोडली. तर दोघांनी शिवीगाळ करीत मारहाण केली. सातपूर पोलिसात गुन्हा दाखल आहे.

आमिष दाखवून अत्याचार

नाशिक । सोशल मीडियावरून ओळख झाल्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून संशयिताने पीडितेवर बलात्कार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. हर्षद काशिनाथ क्षीरसागर (रा. मोखाडा, जि. पालघर) असे संशयिताचे नाव आहे. पीडितेच्या फिर्यादीनुसार, २०२० मध्ये त्यांनी फेसबुकवरून ओळख झाली. त्यानंतर त्यांच्यात मैत्री होऊन प्रेमसंबंध निर्माण झाले. संशयिताने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तिला मार्च २०२२ मध्ये खुटवडनगर परिसरातील लॉजमधये नेले आणि तिच्याशी शारीरिक संबंध केले. त्यानंतरही त्याने पीडितेच्या घरी जाऊन शारीरिक संबंध केले. अंबड पोलिसात बलात्काराचा गुन्हा दाखल आहे.

वाहतूक अंमलदारास मारहाण

नाशिक । प्रतिनिधी

'तुम्ही शासनाचा पगार घेतात ना, मग ट्रॅफिक जाम का?' असे म्हणत संतप्त दुचाकीस्वार संशयिताने वाहतूक पोलिसास मारहाण केल्याची घटना सातपूरच्या अशोकनगर भाजी मार्केटमध्ये घडली. याप्रकणी संशयिताला अटक करून सातपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिकेत भाऊसाहेब पवार (२७, रा. श्रमिकनगर, सातपूर) असे संशयिताचे नाव आहे. पोलीस अंमलदार राजू खंडेराव गवळी (५४) यांच्या फिर्यादीनुसार, ते शनिवारी (दि. १५) रात्री आठच्या सुमारास सातपूर येथील अशोकनगर भाजी मार्केटजवळ वाहतूक नियमन कर्तव्यावर हजर होते. त्यावेळी संशयित अनिकेत त्याच्या पल्सर दुचाकीवरून आला असता, वाहतूक कोंडीचा जाब विचारत, तुम्ही शासनाचा पगार घेता मग वाहतूक कोंडी झाली कशी, असे म्हणत त्यांच्या डोक्यात चापट मारली. तसेच, दमदाटी करीत त्यांच्याशी वाद घालत मारहाण केली. याप्रकणी सातपूर पोलिसात संशयिताविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. यात संशयिताला अटक करण्यात आली असून, सहायक निरीक्षक भडांगे हे तपास करत आहेत.

वंजारी समाजाचा महिला मेळावा

इंदिरानगर । वार्ताहर

इंदिरानगर येथील सुदर्शन हॉल येथे वंजारी समाजाचा महिला मेळावा हळदी-कुंकू कार्यक्रम व विविध स्पर्धेतील महिलांना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम झाला.

के. के. सानप फाउंडेशनच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी मातोश्री शिक्षण संस्थेच्या संचालिका मीना दराडे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते अर्चना गामणे, सुनीता पालवे, स्वाती पानसरे, जयश्री पालवे, गायत्री आव्हाड, कल्पना कराड ,शोभा इप्पर, प्रिया बोडके आदी महिला उपस्थित होत्या. यावेळी गणेश गायकवाड यांचा होम मिनिस्टर कार्यक्रम झाला. स्पर्धेतील महिलांना पैठणी साडी, घड्याळ, बॅग इतर बक्षीस देऊन गौरवण्यात आले. ज्योती फड यांनी गीत सादर केले तर सूत्रसंचालन सीमा ताडगे यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते रवींद्र गामणे व अर्चना गामणे यांच्या संकल्पनेतून मोफत मेकअप वाहन उपलब्ध करून देण्यात आले होते.

रस्तासुरक्षा अभियान

नाशिक । नाशिक वाहतूक विभागातर्फे रस्ता सुरक्षा कार्यक्रमाचे बिटको चौकात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी गोल्डन होरायझन स्कूल बोधलेनगर नाशिकच्या विद्यार्थ्यांनी स्पीक फॉर नाशिकअंतर्गत सहभाग घेतला होता.

स्पीक फॉर नाशिक हा उपक्रम गोल्डन होरायझन स्कूलचे चेअरमन संदीप गोयल यांच्या संकल्पनेतून साकार करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत, वाहनचालकांनी सीट बेल्ट लावणे, रस्त्यावरील बेदरकारपणे वाहन चालवणे टाळणे, हेल्मेट घालणे आणि मद्यधुंद वाहन चालवणे टाळणे यासारख्या रस्ते सुरक्षा पद्धतींचे पालन करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांकडून घोषवाक्याच्या स्वरूपात सांगण्यात आले. तसेच रस्ते अपघात रोखण्यासाठी लोकांना वाहतूक शिस्त विकसित करण्यास प्रोत्साहीत करण्यात आले.

कार्यक्रमास पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, चंद्रकांत खांडवी, सुधाकर सुरुडकर, सुभाष पवार, सचिन जाधव उपस्थित होत.

'मराठा'च्या १६ खेळाडूंना शिष्यवृत्ती

नाशिक । प्रतिनिधी

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नाशिक येथील मराठा हायस्कूलच्या १६ खेळाडूंना नाशिक मनपा अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ३ लाख ८ हजार रुपये क्रीडा शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी माजसंगी व्यासपीठावर मनपा समाज कल्याण विभागाचे उपायुक्त नितीन नेर, मनपा क्रीडा विभागप्रमुख आनंद भालेराव, मराठा हायस्कूलचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम धोरात, उपमुख्याध्यापक रंगनाथ उगले, पर्यवेक्षक राजेंद्र शेळके, शंकर कोतवाल, रामनाथ रायते उपस्थित होते.

मनपा उपायुक्त नितीन नेर यांनी विद्यार्थ्यांना मनपा क्षेत्रातील क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या खेळाडूंकरिता शिष्यवृत्ती योजनांविषयी माहिती दिली. तसेच राज्यस्तरावरील क्रीडा शिष्यवृत्ती अर्थसहाय्य योजनेअंतर्गत मराठा हायस्कूल नाशिक हॅन्डबॉल या क्रीडा स्पर्धेमध्ये १४ वर्षाआतील मुलांच्या संघाने राज्यस्तरीय शालेय हॅन्डबॉल स्पर्धा सन २०२३-२४ राज्यात प्रथम क्रमांक मिळवला होता. या सर्व हॅन्डबॉलच्या १५ खेळाडूंना नाशिक मनपा अंतर्गत शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली असल्याचे सांगितले.

या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये वरुण कांगणे, रेहान शेख, रोहन महाले, ज्ञानेश ठाकरे, अजिक्य कहार, हितेश हांडगे, सार्थक गवळी, मयंक बोके, सोहम खैरनार, गोविंद चव्हाणके, स्वराज लांडगे, साहिल सानप, प्रतीक बामणे, पृथ्वीराज खैरनार, आदित्य भोईर यांचा समावेश आहे. या प्रत्येक खेळाडूला २० हजार रू. शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. जलतरण या क्रीडा स्पर्धेमध्ये रुद्र बच्छाव या खेळाडूला ८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळाली आहे. अशी एकूण शिष्यवृत्ती रुलाख ८ हजार रु. मिळाली. वरील सर्व खेळाडूंचा उपायुक्त नितीन नेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक जयंत आहेर, मंगला शिंदे, सुहास खर्डे, राजाराम पोटे, हरीभाऊ डेर्ले, अनिल उगले, सुयश कुभार्डे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक अनिल उगले यांनी तर पर्यवेक्षक शंकर कोतवाल यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

हॉटेल संजय लीकर बार, कळवण. चायनीज कूक व वेटर पाहिजे. मो. 9637777109 / 9370075335.
(16/02-BK-10072)

गंगापूररोड पाईपलाईनरोड येथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफीसबॉय पाहिजे. 8237311211.
(21/02-BK-10269)

खरेदी/विक्री

पेठरोड फ्रंट रामशेत २७१/२ एकर जमीन विकणे. मखमलाबादमध्ये २ एकर व लखमापूरमध्ये इंडस्ट्रीयल प्लॉट विकणे आहे. 9850953456.
(17/02-BK-9987)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे अॅडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपचार... अॅडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26)
(CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. WWW. drpalvenasha muktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26)
(CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट अॅलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26)
(CRINV-23-24JL/ CRG00556)

विवाह विषयक

सुंदर वधू वय : २७, उंची : ५.३, शिक्षण : १२ वी कंपनीत काम करते, वेतन : १०,०००/- मुलीला आई-वडील नाही. काका-काकूकडे राहते. अपेक्षा : मुलगा निर्व्यसनी हवा (त्वरित विवाह). 9579032497. (BK-10189)

नावात बदल

I Jayashri Devaji Thakare In My son's birth certificate no 1062 issued at nashik divisinol Officer N.M.C my name is mentioned as Nikita Devaji Thakare therefore Jayashri Devaji Thakare and Nikita Devaji Thakare both the person are same as per Aadhar No.999 0995 2750

माझे जुने नाव मिनाक्षी हितेश पंड्या असे होते. आता माझे नवीन नाव मिनाक्षी प्रकाश पळसकर असे झाले आहे. आधार नंबर ८७३१९८७३७२०१ (Bk-10270)

माझे लग्नापूर्वीचे जुने नाव अनिताबाई प्रभाकर आहेर असे होते. आता लग्नानंतर माझे नवीन नाव सौ. सरला ईश्वर बोरसे असे झाले आहे. या दोन्ही नावांची व्यक्ती एकच आहे. एफिडेव्हिट नं . २२५१६४१५२१२६८१०११००००८

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

निधन वार्ता...

गंगूताई धामणकर

नाशिक । येथील आदर्श ब्रेड उद्योग समूहाच्या संचालिका गंगूताई धामणकर यांचे निधन झाले. गंगूताई धामणकर या पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या हितचिंतक तसेच सह्यागार मंडळाचे कार्यरत होत्या. त्यांच्या पश्चात तीन बहिणी व दोन भाऊ असा परिवार आहे.

सुदाम ढगे

नाशिक । पेठरोड, पंचवटी, नाशिक येथील सामाजिक कार्यकर्ते व सुप्रसिध्द ढगे बंधू भेळभत्याचे संचालक सुदाम विष्णू ढगे (४५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, भाऊ, पुतण्या असा परिवार आहे.

मोहन जमदाडे

मातेरेवाडी । दिंडोरी तालुक्यातील मातेरेवाडी येथील प्रगतिशील शेतकरी जानोरी विकास सोसायटी सचिव मोहन वसंतराव जमदाडे यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, दोन मुली, भाऊ, पुतण्या, पुतणी असा परिवार आहे.

लक्ष्मण आवारे

कसबे सुकेणे। शिरवाडे वाकद (ता.निफाड) येथील प्रगतिशील शेतकरी व कोपरगाव संजीवनी सहकारी साखर कारखान्याच्या शेतकी विभागातील सेवानिवृत्त सेवक लक्ष्मण गोपाळराव आवारे (८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रगतिशील शेतकरी संजय, सतीश व कल्याण आवारे यांचे ते वडील होत.

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग**, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड** : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉइंट. ०२५३-२२६२७५६◆ **निफाड** : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॉन्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆**दिंडोरी** : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ **मालेगाव** : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆**सिन्नर** : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.